


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ८०७ वा | बुधवार दि. १९ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाराष्ट्रातील नेतृत्वाबाबत भाजपचा अखेर अंतिम निर्णय
## विधानसभेची रणनीती ही ठरली...

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

महाराष्ट्रातील भाजप नेतृत्वात कोणताही बदल करण्यात येणार नाही असे पक्षाने मंगळवारी स्पष्ट केले लोकसभा निवडणुकात महाराष्ट्रात भाजपला जे अपयश आले त्यानंतर भाजपच्या नेतृत्वात बदल होईल अशी चर्चा होती पण त्याला पक्षाच्या निर्णयाने पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्र भाजपच्या महत्वाच्या नेत्याशी भाजपच अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीतील भाजप मुख्यालयात चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला या बैठकीला केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव पियुष गोयाल अश्विनी वैष्णव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पक्षाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील पंकजा मुंडे विनोद तावडे आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या भाजप नेतृत्वात कोणताही बदल करण्यात येणार नाही असे केंद्रीय मंत्री पियुष गोयाल यांनी पत्रकारांना मंगळवारी सांगितले यंदा लोकसभा निवडणुकात भाजपने महाराष्ट्रात नऊ जागा जिंकल्या २०१९ च्या लोकसभा निवडणुकात भाजपने राज्यात २२ जागा जिंकल्या होत्या. भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी रोड मॅप दिला आहे. लोकसभा निवडणूक हरण्याच्या कारणावरही यावेळी चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीत जातीय राजकारणाचा फटका टाळण्यासाठी व मराठा समाजाची नाराजी दूर करण्यासाठी भाजप मोठा निर्णय घेणार आहे. बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस म्हणाले की लोकसभा निवडणुकीच्या निकालावर परिणाम करणारे घटक आणि आगामी विधानसभा निवडणुकीत त्या उनिवा कशा दूर करता येतील अशा सर्व मुद्द्यावर चर्चा झाली आहे. भाजप महायुतीत समाविष्ट असलेल्या मित्रा पक्षाची ही चर्चा करण्यात आली सूत्राने दिलेल्या माहितीनुसार




मराठा मुस्लिम आणि मागासवर्गीय भाजपच्या विरोधात एकत्र येऊन मतदान करत असल्याचा मुद्दा चर्चेला गेला. आठव्या लोकसभेच्या अध्यक्षपदासाठी ओम बिर्ला यांचे नाव पुन्हा आघाडीवर आहे केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी एनडीएच्या नेत्यांची बैठक मंगळवारी पार पडली यात मित्र पक्षांनी एकमताने अध्यक्ष पदाचा निर्णय पंतप्रधान मोदीवर सोडण्याचा निर्णय घेतला.

---

# भरधाव खासगी बस ट्रकवर आदळली, दोघे गंभीर जखमी
## समृद्धी महामार्गावरील घटना : काही काळ वाहतूक ठप्प

**जनसंचलन/दुसरबीड**

समृद्धी महामार्गावर भरधाव खासगी बस समोरील ट्रकवर आदळल्याने चालक व क्लिनर जखमी झाले ही घटना १८ जून रोजी सकाळी ५ वाजता घडली महादेव मोतीराम राऊत व ज्ञानेश्वर वानखेडे असे जखमींची नाव आहेत खासगी बस क्रमांक एम.एच. ३७ टी ८००० पुण्यावरून पुसदकडे जात जात होती समृद्धी महामार्गावर दुसरबीड जवळ चॅनल क्र ३१८ नागपूर कॉरीडोअवर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही बस समोरील ट्रक क्रमांक सीजी ०७ बीई ८५२१ वर मागून आदळली यामध्ये चालक महादेव राऊत व क्लिनर ज्ञानेश्वर वानखेडे हे गंभीर जखमी झाले सुदैवाने बसमधील प्रवाशी बचावले. या बसमध्ये २० प्रवाशी होते



घटनेची माहिती मिळताच किनगाव राजा पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेऊन जखमींना बिबी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान समृद्धी महामार्गावर गेल्या एक ते दोन महिन्यात अपघाताचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.

# दोषींना लवकरात लवकर अटक करून त्यांना कठोर शिक्षा देण्यात यावी - मुकनायक फाउंडेशन

**जनसंचलन/बुलढाणा**

मलकापूर तालुक्यातील डिडोळा या गावात राहणाऱ्या २१ वर्षीय तरुणाची धरणगाव या ठिकाणी दगडाने ठेचून हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली आहे. २१ वर्षे मुलाचे वडील यांनी मूकनायक फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश पवार यांच्याकडे याप्रकरणी माहिती दिली सतीश पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले व अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांना निवेदन दिले या निवेदनामध्ये दिलेल्या माहितीनुसार आरोपी यांना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी मूकनायक फाउंडेशनच्या वतीने पोलीस प्रशासनाला करण्यात आली आहे



येत्या सात दिवसाच्या आत कारवाई न केल्यास तीव्र व व्यापक स्वरूपाचे आंदोलन संविधानिक मार्गाने करण्यात येईल असा इशारा मूकनायक फाउंडेशन च्या वतीने प्रशासनाला देण्यात आला आहे. याप्रसंगी मृतक दीपक सोनवणे यांचे कुटुंबीय तथा समस्त गावकरी यांच्यासह मूकनायक फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश पवार, बाला राऊत, अर्जुन खरात, सतीश गुरचवळे, ॲड. एस.एस. सुरडकर व इतर पदाधिकारी बहुसंख्याने या ठिकाणी उपस्थित होते.

# लोणार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश प्रक्रिया

**जनसंचलन/ लोणार**

लोणार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत यावर्षीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावर्षीची प्रवेश प्रक्रिया ३ जूनपासून ऑनलाईन स्वरुपात सुरु झाली आहे. या प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक संचालनालयाचे संकेतस्तळ ... जाहीर केले आहे. यंदा प्रवेश अर्ज व नोंदणी शुल्क भरणे, आयटीआय केंद्राची निवड करणे, प्रवेश अर्जात सुधारणा, दुरुस्ती करणे, हरकती नोंदविणे आदी सर्व कामे विद्यार्थ्यांना ऑनलाईन करता येणार आहेत. ही सर्व कामे आयटीआयमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना माफक दरात करून मिळतील. यावर्षी प्रवेशासाठी लोणार आयटीआयमध्ये ५ व्यवसाय उपलब्ध आहेत. यात ड्रेस मेकिंग, कोपा, वायरमन, फिटर, वूड वर्क टेकनिशियन हे व्यवसाय प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. यावर्षी लोणार आयटीआय मध्ये एकून १०८ जागांसाठी प्रवेश होणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना मूळ कागदपत्रे सादर करून आपला प्रवेश निश्चित करावा. अर्ज भरल्यानंतर प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी नजीकच्या कोणत्याही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपस्थित राहून अर्ज निश्चित करता येणार आहे. त्या विद्यार्थ्यांचा प्रवेश संदर्भातील पाठपुरावा त्या आयटीआयची यंत्रणा करणार आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना नोंदविलेला दूरध्वनी क्रमांक आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत तोच ठेवावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना केंद्राच्या संकेतस्थळावर माहिती अपलोड करताना हा मोबाईल क्रमांक लॉगीन असणार आहे. त्यामुळे हॉल तिकीट, परीक्षा विषयक माहिती, तसेच अंतिम प्रमाणपत्र प्राप्त करणे यासाठी आवश्यक असणार आहे. यामुळे हा दूरध्वनी क्रमांक अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सुरु ठेवणे आवश्यक असणार आहे. त्यामुळे हा दूरध्वनी क्रमांक अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सुरु ठेवणे आवश्यक असणार आहे. त्यामुळे अर्जावर काळजी पूर्वक मोबाईल नंबर टाकावा लागणार आहे. प्रशिक्षणार्थ्यांना उत्पनाच्या आधारे दरमहा ५०० रुपये विद्यावेतन मिळणार आहे. प्रवेशासंदर्भातील माहितीसाठी ९७६६७६२८९८, ९७६५०२७३७६, ९८२३३१४८७२, ७८७५०८९०११, ७४४७४५२९५८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खरीप हंगामातील पात्र लाभार्थ्यांना पिक विमा रक्कम अदा करण्यात यावी...

## आ. संजय गायकवाड यांची कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कडे मागणी

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मोताळा व बुलढाणा या दोन तालुक्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांना वर्ष २०२३-२४ मध्ये प्रधानमंत्री पिकविमा योजनेचा लाभ मिळाला नाही, तरी सदर योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना तात्काळ पिकविमा रक्कम अदा करण्यात यावी तथा पिकविमा कंपन्यांना या संदर्भात जास्तीत-जास्त शेतकऱ्यांना लाभ होईल असे निर्देश देण्याची मागणी बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मवीर श्री संजय गायकवाड यांनी केली..! या संदर्भात त्यांनी आज १८ जून रोजी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना पत्र दिले सदर पत्रात नमूद करण्यात आले आहे की,बुलढाणा व मोताळा या दोन तालुक्यात वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण ३३ हजार ८७३ शेतकऱ्यांनी पिकविमा भरला होता, दरम्यान नुकसान झाल्यानंतर २२ हजार ६७८ शेतकऱ्यांनी तक्रारी नोंदवल्या होत्या मात्र यापैकी केवळ १४२८ तक्रारी या ग्राह्य धरण्यात आल्या तर काढणीपश्चात १९०७ तक्रारीपैकी १८३ तक्रारी नुकसानीस पात्र जाहीर करण्यात आल्या...!

पिकविमा एरिया अप्रोच अंतर्गत १२३२ शेतकऱ्यांचे २४२.९९ लक्ष काढणीपश्चत नुकसानीचे १५८ शेतकऱ्यांचे ४२.९ लक्ष एरिया अप्रोच अंतर्गत १२ ३२ शेतकऱ्यांचे ४५.०४ असे बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील एकूण २६७६ शेतकऱ्यांचे खात्यामध्ये तत्काळ रक्कम जमा करण्यासंदर्भात आपल्या स्तरावर आदेश देण्यात यावे तसेच स्थानिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान अंतर्गत २२,६७८ व १९०७ नोंदविण्यात आलेल्या तक्रारीपैकी २१,२५० स्थानिक आपत्तीच्या व १७२४ काडणीपश्चात तक्रारी विमाकंपन्याकडून रद्द करण्यात आलेल्या आहेत, पिकविमा कंपनीचे जिल्हा तसेच तालुकास्तरावर असलेल्या कार्यालयात मनुष्यबळ ही अपुरे आहे,या कार्यालयात मनुष्यबळ बळकटीकरण करण्याची आवश्यकता आहे,जेणेकरून प्राप्त तक्रारीचा लवकरात-लवकर निपटारा करण्यात येईल व याचा लाभ शेतकऱ्यांना होईल या प्रकरणी पिकविमा कंपन्यास तात्काळ निर्देश देण्यात यावे अशी मागणी आमदार धर्मवीर श्री संजय गायकवाड यांनी केली आहे...!

# हिवरा आश्रम येथे चोरट्यांनी तीन घरे फोडली

**जनसंचलन/हिवरा आश्रम**

साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत हिवरा आश्रम येथे अज्ञात चोरट्यांनी तीन घरे फोडून येथील वार्ड क्रमांक चार मधील तीन घरे फोडली असून हजारो रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या गावात चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असून दोन दिवसाआधी लाखोचा ऐवज लंपास केला होता. आता झालेल्या चोरीमध्ये घरासमोरील मोटारसायकल सुध्दा चोरट्यांनी लंपास केली आहे. साखरखेर्डा येथील वार्ड क्रमांक चार मधील शेख अक्रम शेख कासम , सचिन तानाजी सोळंके , आणि लखन संजय कामे यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला . घरातील लोखंडी कपाट उघडून त्यातील सोन्याचा पट्टा १ हजार , मणी १ हजार २०० रुपये , गंठण २५ हजार रुपये , चांदीचे



पैजन १ हजार रुपये व इतर ५०० रुपये साहित्य आणि नगदी १२ हजार असा ६७ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.शेख अक्रम यांच्यासह तिघांच्या फिर्यादीवरून साखरखेर्डा पोलिसांनी १७ जून रोजी रात्री अज्ञात आरोपी विरोधात कलम ४५७ , ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे . पुढील तपास ठाणेदार स्वप्निल नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पो हे कॉ . बाजीराव खरात करीत आहेत. चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असल्याने साखरखेर्डा पोलीस करतात तरी काय?असा प्रश्न गावकरी विचारत आहे.

# अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या नाविन्यपूर्ण योजना

**जनसंचलन/बुलडाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातर्फे मातंग व तत्सम पोटजातीतील नागरिकांसाठी नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी दि. १२ जुलैपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित बुलडाणा मार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुटुंबांची सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत, म्हणून समाजातील गरजूंना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध व्हावे, ज्या व्यवसायाचे प्रशिक्षण हवे, त्या व्यवसायाच्या प्रशिक्षणासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता जिल्ह्याकरीता ४०० प्रशिक्षण योजनेचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. यासाठी इच्छुक अर्जदारांनी महामंडळाच्या विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा जिल्हा कार्यालयास सादर करावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे.अर्जासोबत अर्जदाराने जातीचा दाखला सक्षम अधिकारी यांच्याकडून घेतलेला असावा, अर्जदाराचा कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला उत्पन्न मर्यादा ३ लाखापर्यंत तहसीलदार यांच्याकडुन घेतलेला असावा, नुकताच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटो, रेशनकार्डच्या झेरॉक्स प्रत, आधार कार्ड झेरॉक्स प्रत, मतदान कार्ड, अर्जदाराचा शैक्षणिक दाखला,



प्रशिक्षणार्थी मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील असावा, प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा, प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ५० वर्षे असावे, प्रशिक्षणार्थींनी यापूर्वी शासन, महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा, एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल, प्रशिक्षणार्थींना आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा लागणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# काले मेघा,काले मेघा पानी तो बरसाओ...

## जिल्ह्यात या तारखेपासून बरसणार जलधारा!

**जनसंचलन/बुलढाणा**

काले मेघा काले मेघा पानी तो बरस-ाओ.. हे गीत सध्या पेरणीकडे डोळे लागलेल्या शेतकऱ्यांना आठवत असेल.. मात्र चिंता करू नका. भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात दि. १८,२०,२१ जून रोजी काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. दि.१९ जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. त्यानंतर दि.२२ जून रोजी बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.तसेच या पाच दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे व दि. १८ ते २० जून दरम्यान वादळी वाऱ्याची शक्यता आहे. जिल्ह्यात आजपर्यंत काही ठिकाणी समाधानकारक पाऊस झाला आहे, परंतु सार्वत्रिक पाऊस अद्याप झालेला नाही. म्हणून सध्याची हवामान परिस्थिती व पाऊसमान लक्षात घेता शेतकरी बंधूनी पेरण-ीची घाई करू नये. जमिनीतील उपयुक्त ओलावा व पेरणीयोग्य पाऊस (७५-१००मिमी)या दोन्ही बाबींची खात्री करून पेरणी करावी. खरीप पिकांच्या पेरणीसाठी वाणांची निवड करताना जमिनीचा प्रकार, आपल्या भागातील हवामान, पाण्याची उप-लब्धता, वाणांची वैशिष्ट्ये व त्या वाणांची बाजारपेठेतील उपलब्धता या सर्व बाबी लक्षात घेणे आवश्यक




आहे. मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पाहता शेतकऱ्यांनी स्वत:ची व आपापल्या जनावरांची योग्य ती काळजी घ्यावी.विजांच्या पुर्वसुचनेसाठी दामिनी या मोबाईल ॲपचा वापर करावा असे आवाहन श्री.यदुलवार जिल्हा कृषी हवामान केंद्र,कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणाडॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला यांनी केले आहे.

# खामगाव, मलकापूर येथे करिअर शिबीर

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव आणि मलकापूर येथे छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर गुरूवार, दि. २० जून रोजी आयोजित करण्यात आले आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगावच्या वतीने खामगव येथील कोल्हटकर स्मारक मंदिर, केला हिन्दी शाळेच्या मागे येथे सकाळी ११ वाजता शिबिर घेण्यात येणार आहे. आमदार ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन होईल. या शिबीरास जिल्हा, तालुक्यातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य एस. डी. गंगावणे यांनी केले आहे. नांदुरा आणि मलकापूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने गुरूवार, दि. २० जून २०२४ रोजी सकाळी १० वाजता करिअर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार राजेश एकडे उद्घाटक म्हणून उपस्थित राहतील. करीअर मार्गदर्शक सचिन वारूळकार मार्गदर्शन करतील. यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बहिणीच्या लग्नाची शिदोरी आणण्यासाठी जात असलेल्या भावावर काळाने घातला घात...

**जनसंचलन/ नांदुरा**

रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकवर दुचाकी आदळून झालेल्या अपघातात एक ठार तर एक जखमी झाले आहे ही घटना दि १७ जून रोजी सकाळच्या सुमारास नांदुरा मलकापूर रोडवर घडली आहे. सविस्तर वृत्त असे की राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर वडनेर भोलजी येथील टाटा सर्विस सेंटर समोर रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रक व दुचाकी आदळली या भीषण अपघातात एक ठार तर एक जखमी झाले आहे ही घटना १७ जून रोजी सकाळी ११ वाजेच्या समोर घडली आहे. तक्रार कर्ता प्रशांत सख-ाराम लाहुडकर रा.शेगाव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार प्रज्वल दशरथ काळे वय २० वर्षीय रा दसनूर ता रावेर व शुभम मुकुटराव निळे रा रखेड ता शेगाव हे दोघे बहिणीच्या लग्नाची शिदोरी अन्याय करता वाघूळला निघाले होते यावेळी नांदुऱ्यावरून मलकापूरकडे जात असताना आरजे ३९ जीए १६०२ या क्रमांकाचा मालवाहू ट्रक निष्काळजीपणे रस्त्यावर उभे करून इतर वाहनांना वापरण्याकरिता धोका व अडथळा किंवा कोणत्याही सूचनेचे फलक न लावता किंवा खुणा रस्त्यावर न लावता उभा केला होता. दरम्यान दुचाकीस्वार ट्रक सुरू असल्याचा भास झाला व त्यामुळे त्याची एम एच ३० ए के २८२८ या क्रमांकाची दुचाकी उभ्या ट्रकवर जाऊन



आदळली त्यामुळे प्रज्वल दशरथ काळे यांच्या डोक्याला मार लागून त्याचा जागेवरच मृत्यू झाला तर पाठीमागे बसलेल्या शुभम निळे हा जखमी झाला. तक्रारकर्त्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी ट्रक चालकावर विविध कलमानुसार मोटर वाहक कायदा कलम १२२/१७७ खाली गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास पोलीस करीत आहे

# थुकरटांचा थुकरटपणा जाईना!

## जिल्हा स्त्री रूग्णालयात ११ जणांवर दंडात्मक कारवाई



**जनसंचलन/बुलडाणा**

कुठेही तंबाखू गुटखा खाऊन भिंतीवर थुंकण्याची सवय जाता जात नाही. शासकीय कार्यालयांचे कोपरे अगदी रंगलेले दिसून येतात. अशा ११ थुकरटांवर कोटपा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा स्त्री रूग्णालयात ११ जणांवर कारवाई करण्यात आली. यात त्यांच्यावर एक हजार ६०० रूपयांचा दंड आकारण्यात आला. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आज जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण, स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्त्री रुग्णालय आणि परिसरात तंबाखू, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ खाताना आढळल्यास त्यांच्यावर कोटपाच्या कलम चार नुसार ११ जणांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. यात १ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. यासाठी रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी मदत केली.

# व्याजाचे पैसे थकल्यामुळे मुलाला जीवे मारले!

**जनसंचलन/बुलढाणा**

व्याजाने पैसे घेतल्याच्या वादातून मुलाला मारून टाकल्याचा आरोप राजू नंनवरे यांनी केला असून न्यायासाठी कुटुंबीयांनी उपोषण सुरू केले आहे. या संदर्भातील निवेदन देखील जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहे. राजू नंनवरे रा. माळी पेठ तालुका मेहकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, याच गावातील आरोपी अवैध सावकार योगेश सौभागे याच्या सुनिल थिगळे या मित्रामार्फत माझ्या आकाश नामक मुलाने व्याजाने पैसे घेतले होते. हप्ता थकल्यामुळे आरोपी योगेश सौभागे, सुनिल थिगळे बरोबर आकाशला जिवे मारण्याची धमकी देत होते. दरम्यान २४/०५/२०२४ रोजी उपरोक्त आर-ोपी व इतर हस्तकांनी आकाशला जबर मारहाण केली. आकाशला रुग्णालयात दाखल केले असता त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी आर-ोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय समोर संपूर्ण कुटुंब न्याय मिळण्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले आहे



पावसाळा सुरू झाला आहे पाऊस येत असताना सुद्धा कुटुंब मांगे हटत नाही जोपर्यंत आरोपीला शिक्षा होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नाही असा इशारा कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आला आहे.

# विविध विषयांवर मिळणार मार्गदर्शन

**जनसंचलन/बुलढाणा**

या पंधरवड्यात गाव पातळीवर शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन करण्यात येत आहे. यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना, हवामान आधारित फळपीक विमा योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन




योजना, जमीन आरोग्य पत्रिका, रोग व किडी कार्यक्रम, फळबाग लागवड, पी. एम. किसान, आपत्कालीन पीक नियोजन बाबत यासारख्या अनेक विषयावर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

# पोलीस भरतीच्या १७ हजार जागांसाठी १७ लाख अर्ज, रोहित पवार यांचा संताप...

वृत्तसंस्था/मुंबई

राज्याभरात उद्यापासून (बुधवार) पोलीस भरती सुरू होणार आहे. विविध पदांसाठी होणाऱ्या भरतीमध्ये एका पदासाठी सरासरी सुमारे १०१ अर्ज आले आहेत. एकूण १७हजार ४७१ पदांसाठी १७.७६ लाख अर्ज आलेले आहेत. विशेष म्हणजे यामध्ये डॉक्टर्स, इंजिनीयर, वकीलीचे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांचाही समावेश असून प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये उच्चशिक्षितांचे प्रमाण ४०% हून अधिक आहे. महाराष्ट्रातल्या हीच भीषण बेरोजगारी अधोरेखित करताना राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवार यांनी राजकीय पक्षांसाठी चिंतन ट्विट केले आहे. मंत्रिमंडळ विस्तारात कोणाला कुठले खाते मिळेल, कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील यावर मात्र आज जोरदार चर्चा होतेय. मात्र बेरोजगारीवर चर्चा होत नाही. ? इंजिनियरिंग, डॉक्टरकी, वकिली सारखे उच्चशिक्षण घेऊनही नोकरी भेटत नाही म्हणून पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या युवांची की युवांना रोजगार उपलब्ध न करू शकणाऱ्या व्यवस्थेची? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.राज्यात उद्यापासून पोलीस भरती प्रक्रिया सुरु होत असून १७४७१ पदांसाठी १७.७६ लाख अर्ज म्हणजेच एका जागेसाठी तब्बल १०१ अर्ज आलेले आहेत. विशेष म्हणजे यामध्ये डॉक्टर्स, इंजिनीयर, वकीलीचे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांचाही समावेश असून प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये उच्चशिक्षितांचे प्रमाण ४० टक्क्यांहून अधिक आहे.यामध्ये चूक कोणाची? इंजिनियरिंग, डॉक्टरकी, वकिली सारखे उच्चशिक्षण घेऊनही नोकरी भेटत नाही म्हणून पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या युवांची की युवांना रोजगार उपलब्ध न करू शकणाऱ्या व्यवस्थेची?ही बाब अतिशय चिंताजनक असून महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी आहे. पण दुर्दैवाने आपल्या प्रगत महाराष्ट्रात याची चर्चा होणार नाही, कारण हे विषय सर्वसामान्यांचे गोरगरिबांच्या पोरांचे आहेत. मंत्रिमंडळ विस्तारात कोणाला कुठले खाते मिळेल, कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील यावर मात्र आज जोरदार चर्चा होतेय. आज सर्वच राजकीय पक्षांनी खऱ्या अर्थाने चिंतन करण्याची वेळ आलेली आहे. सर्वसामान्यांचेही विषय कधीतरी मुख्य चर्चेत येतील, अशी अपेक्षा त्यांनी ट्विटमधून व्यक्त केली आहे.मैदानी चाचणी, शारीरिक चाचणी आणि शेवटी लेखी परीक्षा अशा पद्धतीने पोलीस भरती सुरू होणार आहे. यंदाही



अव काही हजार जागांसाठी लाखो उमेदवार स्पर्धेत आहेत. पोलीस शिपाई, चालक, बँड्समन, शीघ्र कृती दलातील पदे आणि तुरूंग विभागातील पदांसाठी ही भरती होईल. १७ हजार ४७१ जागांसाठी १७ लाख ७६ हजार २५६ अर्ज आले आहेत. बँड्समनसाठी ४१ जागा असून त्यासाठी ३२ हजार २६ जणांनी अर्ज केला आहे.


# विधानसभेलाही विरोधक फेक नरेटिव्ह मांडतील, प्रत्युत्तर द्या- संघाचा भाजपला सल्ला

वृत्तसंस्था/ पुणे

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी निर्माण केलेल्या कथनाचा (नरेटिव्ह) भारतीय जनता पक्ष व महायुतीला फटका बसला. त्याला योग्य प्रत्युत्तर देता आले नाही. आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विरोधकांचा कथनावरच भर असेल. त्यामुळे त्याला प्रत्युत्तर देण्याची तयारी ठेवा, असा सल्ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांना देत पराभवाची कारणमीमांसा केल्याचे समजते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व परिवारातील संघटनांची पश्चिम प्रांत बैठक सोमवारी मोतीबागेत पार पडली. या बैठकीला राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार धनंजय महाडिक, आमदार गोपीचंद पडळकर, प्रा. राम शिंदे, माजी आमदार बाळा भेगडे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, योगेश टिळेकर यांच्यासह संघाचे सह सरकार्यवाह अतुल लिमये यांच्यासह प्रांताचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपला आलेल्या अपयशाचा आढावा घेतानाच आगामी निवडणुकांना कसे सामोरे जायचे, याविषयीही या बैठकीत चर्चा झाली. या बैठकीत उपस्थित काही राजकीय नेत्यांशी पदाधिकाऱ्यांची वैयक्तिक चर्चा झाल्याचेही कळते. संघ परिवारातील जनसंघटना श्रेणीतील भाजप, अभाविप, मजदूर संघ आदींच्या नियमित आढाव्यासाठीची ही पूर्वनियोजित बैठक होती. पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे व परिवारातील संस्थांतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांचा आढावा व नियोजन यावर या बैठकीत चर्चा झाली, असेही सूत्रांनी स्पष्ट केले.राज्यातील महायुती अभेद्य असून, आम्ही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाऊ. लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडून जात, द्वेष आणि चुकीची माहिती आणि प्रचार केल्याचे दिसून आले. पराभवाचे दोषारोप कोणावरही निश्चित न करता विरोधकांना जशास तसे प्रत्युत्तर देऊ,फ असे प्रा. राम शिंदे म्हणाले.

## महाराष्ट्रात पुन्हा राजकीय घमासान विधान परिषदेच्या ११ जागांची निवडणूक जाहीर

वृत्तसंस्था/मुंबई



लोकसभा निवडणुका संपल्यानंतर आता महाराष्ट्रात पुन्हा एकदा राजकीय घमासान पाहायला मिळणार आहे. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. विधानसभा सदस्यांकडून विधान परिषद सदस्यांना निवडून देण्यात येते. त्या ११ जागांची निवडणूक आयोगातून निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. डॉ. मनिषा कायंदे, अब्दुल्ला खान दुर्रानी, निलय नाईक, एड. अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वझाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर, जयंत पाटील यांचा कार्यकाळ २७ जुलै २०२४ रोजी संपणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार विधान परिषद निवडणुकीसाठी २५ जून रोजी नोटिफिकेशन काढण्यात येणार आहे. २ जुलैपर्यंत नॉमिनेशन भरता येणार आहे. ३ जुलै रोजी स्क्रूटीनीटी होणार आहे. ५ जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे.विधानसभा सदस्या कडून विधान परिषद सदस्यांना निवडून द्यायच्या अकरा जागांची निवडणूक आयोगातून निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. यासाठी २५ जून पासून २ जुलै पर्यंत अर्ज भरण्याची मुदत देण्यात आली आहे. ५ जुलै रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. १२ जुलै रोजी रोजी यासाठी मतदान होणार आहे. सकाळी ९ ते संध्याकाळी चार या वेळेत पार पडणार मतदान होणार असून १२ जुलै रोजीच संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.

# धाड येथील नवीन बियर बारची परवानगी रद्द करण्याची मागणी...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील धाड येथे नवीन बियर बारला शेजाऱ्याची हरकत तसेच गावात नवीन परवाने ना देण्याचा ग्राम पंचायतीचा ठराव असतांना देखील राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाधिकाऱ्यांची दिशाभूल करून परवाना मिळवून दिल्याचा खळ बळजनक आरोप धाड येथील सै.साबीर सै.अली यांनी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटिल यांना आज १८ जुनला दुपारी ३ वाजता दिलेल्या निवेदनात करत तात्काळ सदर परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारकर्ता सै.साबीर सै.अली यांनी निवेदनात नमुद केले आहे की,मौजे धाड येथील गट नंबर १२ मध्ये त्यांच्या सामायिक भूखंडाला लागून त्याच गटात रामचंद्र खांडवे यांच्या जागेत नवीन बियर बार सुरू होणार आहे. त्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून त्यांचा बयान नोंदविण्यात आला.या बयानात त्यांनी बियर बारला विरोध दर्शवलेला आहे.सदर प्रकरण अंतिम मंजूरीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खालील समितिकडे ६ जूनच्या बैठकीत ठेवण्यात आला व समितीच्या या सभेत सदर बियर बारला परवानगी दिल्याचे कळाले.या प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाधिकारी यांची दिशाभूल करून सदर बियर बारला परवानगी मिळवून घेतली आहे.तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने नवीन बियर बार चालकाकडून आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप देखील निवेदनात करण्यात आला आहे.सदर परवानगी तात्काळ रद्द करून न्याय द्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालय समोर आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देखील निवेदनात देण्यात आला आहे.

